ePaper
जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्राध्यापकावर लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 07 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






पान 3 वरुन...
गणेशोत्सवासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका सज्ज!

## पाच मजली इमारत कोसळली; अनेकजण अडकल्याची शक्यता

# दिल्लीत मोठी दुर्घटना!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीमधील सत्य निकेतन परिसरात रविवारी दुपारी एक मोठी दुर्घटना घडली आहे. एक पाच मजली इमारत अचानक कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. ही घटना घडल्यानंतर तातडीने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे.**






❝ आर. के. पुरममधील सत्य निकेतन येथे घडलेल्या इमारत दुर्घटनेबद्दल मी तीव्र चिंता व्यक्त करते. डीडीएमए, एनडीआरएफ, दिल्ली अग्निशामक दल, दिल्ली पोलीस, एमसीडी, कॅट्स आणि नागरी संरक्षण दलाची पथके युद्धपातळीवर बचाव कार्य करत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून शेजारील इमारत रिकामी करण्यात आली आहे. अडकलेल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी आणि बाधित कुटुंबांना तात्काळ मदत देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून असून सर्व संबंधित यंत्रणा एकमेकांच्या समन्वयाने काम करत आहेत. प्रत्येक नागरिकाची सुरक्षा आणि कल्याण हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे.

- रेखा गुप्ता, मुख्यमंत्री.

इमारत कोसळल्याच्या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिकांनीही गर्दी केली होती. दिल्ली पोलीस आणि अग्निशमन दलाची पथके देखील घटनास्थळी दाखल झाले असून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे.

सत्य निकेतन परिसरात इमारत कोसळल्याच्या घटनेबाबत दिल्ली पोलिसांनी सांगितलं की, ही घटना दुपारी १:३० वाजता घडली. यात अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त समोर आलेलं नाही. ही पाच मजली इमारत 'पेईंग गेस्ट' निवासस्थान म्हणून वापरली जात होती. इमारत कोसळण्याच्या कारणाबाबत सध्या कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. सध्या अग्निशमन दल आणि पोलिसांची पथके घटनास्थळी बचावकार्य करत आहेत.

दरम्यान, दिल्ली विद्यापीठाच्या 'साउथ कॅम्पस'जवळ असलेला सत्य निकेतन हा निवासी परिसर आहे. या ठिकाणी अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी राहतात. बचावकार्यात मदत करण्यासाठी एनएसयूआय सारख्या विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी देखील घटनास्थळी दाखल झाले असून मदतकार्य करत आहेत.

इमारत अचानक कोसळल्यामुळे मोठ्या प्रमाणात ढिगारा साचला आहे. मदत आणि बचाव पथके ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा शोध घेत असून काळजीपूर्वक तो ढिगारा हटवत आहेत. अडकलेल्यांचा शोध घेणं आणि त्यांना लवकरात लवकर सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

दक्षिण-पश्चिम दिल्लीचे पोलीस उपायुक्त अमित गोयल यांनी सांगितलं की, "दुपारी सुमारे १ वाजून ३४ वाजता नानकपुरा गुरुद्वाजवळील एक इमारत कोसळल्याची माहिती देणारा पीसीआर कॉल मिळाला. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे पथकही घटनास्थळी पोहोचले असून मदत व बचाव कार्य वेगाने सुरू आहे."

### सत्य निकेतन भागातील दुसरी घटना

यापूर्वी २०२२ मध्येही सत्य निकेतन भागात अशीच एक दुर्घटना घडली होती, ज्यामध्ये दोघांचा मृत्यू झाला होता आणि अनेक जण जखमी झाले होते. त्यावेळी दुरुस्तीचं काम सुरू असलेल्या एका तीन मजली घराचा स्लॅब (छत) दुपारी सव्वा एकच्या सुमारास कोसळला होता, ज्यात सहा मजूर अडकले होते. दिल्ली अग्निशामक दल, दिल्ली पोलीस आणि एनडीआरएफच्या पथकांनी तासनतास ढिगारा उपसून त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले होते.

# हिंजवडीत शेकडो आयटी अभियंते रस्त्यावर!

## पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर सरकारविरोधात मूक मोर्चा; आदित्य ठाकरेही सहभागी

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कसह परिसरातील पायाभूत सुविधांचा प्रश्न सुटत नसल्याने आयटी कर्मचाऱ्यांसह स्थानिक रहिवासी रविवारी रस्त्यावर उतरले. त्यांचा स्मार्ट आयटी सिटी संकल्प मूक मोर्चा सध्या आयटी पार्कमध्ये सुरू असून त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना ( उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे हेही या आंदोलनात सहभागी झाले आहेत. यानिमित्ताने हिंजवडीतील पायाभूत सुविधांच्या दुरवस्थेचा प्रश्न सरकार गांभीर्याने घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**





या आंदोलनात स्थानिक शेतकरी, रहिवासी, रेसिडेंट वेलफेअर असोसिएशन माण, हिंजवडी-माण-मारूंजी इन्फ्रा फोरम, फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज, हिंजवडी एम्प्लॉईज अँड रेसिडंट्स ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड को-ऑप हाऊसिंग फेडरेशन, मुळशी को-ऑप हाऊसिंग फेडरेशन या संघटना सहभागी झाल्या आहेत. या आंदोलनाची सुरूवात हिंजवडीतील इन्फोसिस सर्कलपासून झाली. हा मोर्चा शिवाजी चौकमार्गे पुन्हा इन्फोसिस सर्कल चौकात येणार असून तिथे या मोर्चाची सांगता होणार आहे. शांततामय पद्धतीने हे आंदोलन सुरु असून, त्यात आयटी कर्मचाऱ्यांसह स्थानिक नागरिक फलक हातात घेऊन आपल्या मागण्या मांडत आहेत.

हिंजवडी, माण आणि मारूंजी परिसरात आयटी पार्कचा विस्तार झालेला आहे. गेल्या काही वर्षांत या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकरण, औद्योगिक विस्तार आणि लोकसंख्या वाढ झाली आहे. मात्र, रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणी पुरवठा, नागरी सुविधांमध्ये वाढ झालेली नाही. याचबरोबर हा परिसर अनेक शासकीय यंत्रणांमध्ये विभागले गेला आहे. मात्र, या यंत्रणांत असलेल्या समन्वयाच्या अभावामुळे नागरी विकासाची कामे होत नसल्याचे चित्र आहे. याबाबत आयटी कर्मचाऱ्यांसह स्थानिक नागरिकांनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. त्यामुळे आयटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला, असे आंदोलकांनी सांगितले.

हिंजवडी, माण, मारूंजी परिसरात दररोज लाखो नागरिक, आयटी कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. खराब रस्ते आणि पाणी पुरवठ्याची समस्या गंभीर बनली आहे. शासकीय यंत्रणांकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कालमर्यादा निश्चित करून शासनाने हे प्रश्न सोडवावेत, अशी आमची मागणी आहे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

### प्रमुख मागण्या

रस्त्यांचे भूसंपादनाचे प्रश्न तातडीने निकाली काढावेत. माण-शिवाजीनगर मेट्रो तातडीने सुरू करावी. मुख्यमंत्र्यांनी सर्व शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक हिंजवडीत घ्यावी. हिंजवडी-माण-मारूंजी परिसरासाठी स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा आढावा बैठक घ्यावी. वाकड उड्डाणपुलासह भूमकर चौक, पुनावळे, ताथवडे येथील भुयारी मार्गातील वाहतूक कोंडी सोडवावी. मुळशी धरणातून दोन टीएमसी पाण्याचा साठा निश्चित करावा. वाहतूक पोलिसांचे मनुष्यबळ दुप्पट करावे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियमितपणे त्रैमासिक आढावा घ्यावा.

# केतन अगरवाल हत्या प्रकरणात तिसरा आरोपी अटकेत; रितेश हंगेला पोलीस कोठडी

**महाईन्यूज । पुणे**

**केतन अगरवाल हत्या प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी शनिवारी रितेश हंगे या आणखी एका आरोपीला अटक केली. हा आरोपी चेतन चौधरीचा मित्र असून, त्याला खुनाच्या कटाची माहिती होती. या कटात तो सामील झाल्याचा आरोप असून, न्यायालयाने त्याला १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.**



केतन अगरवाल याची १८ जून रोजी लोहगड किल्ल्यावरून दरीत ढकलून हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात केतनची नियोजित पत्नी सिया गोयल आणि तिचा मित्र चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली. दोघे सध्या येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणाचा तपास ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

चेतन आणि सियाचे मोबाइल संच पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तांत्रिक तपासात चेतन आणि सिया यांच्यात समाजमाध्यमात झालेले संभाषण काढून (डिलिट) टाकण्यात आल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संबंधित संभाषण पुन्हा (चॅट रिकव्हर) मिळवले. तेव्हा रितेशसोबत चेतनने केतनच्या हत्येबाबत चर्चा केल्याचे उघडकीस आले. केतनची हत्या कशी करायची, याबाबत रितेशने चेतनला काही माहिती दिली होती.

चेतन आणि सियाने १८ जून रोजी रितेशला लोहगडावर येण्यास सांगितले होते. मात्र, रितेशने त्यांना नकार दिला होता. केतनच्या हत्येपूर्वी रितेश चेतनच्या संपर्कात होता. हत्येनंतर चेतनने रितेशची भेट घेतली होती, तसेच सियाही त्याच्या संपर्कात होती, अशी माहिती तपासात मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. रितेशला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. रितेश मूळचा बीड जिल्ह्यातील असून, बालेवाडीतील एका खासगी कंपनीत नोकरी करतो. पोलिसांनी या प्रकरणात त्याला ताब्यात घेऊन यापूर्वी चौकशी केली होती.

‘रितेशला हत्येच्या कटाची माहिती होती. तो प्रत्यक्ष कट रचण्यात सामील होता का नाही, या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. पोलीस कोठडीत त्याची चौकशी केल्यानंतर या प्रकरणात महत्त्वाचे धागेदोरे मिळतील,’ अशी माहिती पोलिसांनी दिली.

### रितेशला आधीच होती कटाची माहिती

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रितेशला केतनच्या हत्येच्या कटाची आधीपासून माहिती होती, असा संशय आहे. चेतन चौधरी आणि रितेश हिंगे यांच्यातील व्हॉट्सअॅप संभाषणाच्या आधारे त्याच्यावर कारवाई करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. हे संभाषण रितेशने डिलीट केलं होतं. मात्र, पोलिसांनी ते रिकव्हर केल्यानंतर तपासात महत्त्वाची माहिती मिळाल्याचं सांगण्यात येत आहे.

# गणेशोत्सवासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका सज्ज!

## स्वच्छता, निर्माल्य संकलन आणि विसर्जन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासह गणेशमूर्ती विसर्जनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. गणेशोत्सव काळात नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि स्वच्छतेच्या दृष्टीने कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी घेतला.**




महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात ही बैठक झाली. यावेळी सहायक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, सुधीर वाघमारे, महेश आढाव, अंकुश झिटे, राजेश भाट, अतुल सोनवणे, मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता व्यवस्था प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते, गणेश मंडळांचे परिसर तसेच विसर्जन मार्गांची नियमित स्वच्छता राखावी. विसर्जनस्थळी आवश्यक मनुष्यबळ, साधनसामग्री आणि स्वच्छता सुविधा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेत गणेशोत्सवासाठीची सर्व तयारी वेळेत पूर्ण करावी. विसर्जनस्थळी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासह निर्माल्य संकलनाची व्यवस्था प्रभावीपणे राबवावी. विसर्जनस्थळी जमा होणारे निर्माल्य नियमितपणे उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावावी. गणेशोत्सव काळात नागरिकांची गर्दी लक्षात घेऊन स्वच्छता कर्मचाऱ्यांची आवश्यक तैनाती करावी, असेही निर्देश देण्यात आले.

गणेशोत्सव काळात स्वच्छता व्यवस्था, निर्माल्य संकलन, कृत्रिम जलकुंडांची व्यवस्था आणि विसर्जनस्थळी आवश्यक सुविधा याबाबत सर्व संबंधितांनी समन्वयाने कार्यवाही करावी. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित गणेशोत्सवाचा अनुभव मिळण्यासाठी आवश्यक सर्व तयारी वेळेत पूर्ण करावी, असे डॉ. ठेंगल यांनी यावेळी सांगितले.

### विसर्जन मार्गांवरील स्वच्छतेवर विशेष भर

गणेशोत्सव काळात गणेश मंडळांचे परिसर, सार्वजनिक ठिकाणे आणि विसर्जन मार्गांची नियमित स्वच्छता करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर कचरा साचणार नाही, यासाठी आवश्यक नियोजन करावे. विसर्जनानंतर संबंधित ठिकाणांची तातडीने स्वच्छता करून परिसर पूर्ववत करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असेही बैठकीत सांगण्यात आले.

### कृत्रिम जलकुंडांची व्यवस्था

गणेशोत्सवाच्या कालावधीत शहरातील सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते, गणेश मंडळांचे परिसर तसेच विसर्जन मार्गांवरील स्वच्छता सुरळीत राहण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेशमूर्ती विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कुंड तसेच गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम जलकुंडांची पुरेशी व्यवस्था करण्याचे निर्देश डॉ. ठेंगल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

---

## बिजलीनगर महावितरण सबस्टेशनमध्ये भीषण स्फोट; अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील बिजलीनगर परिसरातील महावितरणच्या मुख्य वीज उपकेंद्रात (सबस्टेशन) भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरासह आसपासच्या मोठ्या परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षेचा खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील वीजपुरवठा अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात आला आहे.**



हा स्फोट नेमका कोणत्या तांत्रिक बिघाडामुळे अथवा शॉर्टसर्किटमुळे झाला, याचे कारण अद्याप अधिकृतरीत्या समोर आलेले नाही. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि तांत्रिक पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

अचानक वीज गुल झाल्याने लाखो नागरिक, व्यापारी आणि लघुउद्योजकांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठा नेमका कधीपर्यंत पूर्ववत होईल, याबाबत महावितरणकडून अद्याप कोणतीही अधिकृत वेळ निश्चित करण्यात आलेली नसून, तांत्रिक दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतरच वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने सुरळीत केला जाईल, असे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, वीजपुरवठा खंडित झाल्याने विविध भागांतील दैनंदिन व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीच्या माध्यमातून दुरुस्तीचे काम वेगाने सुरू असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले. नागरिकांनी संयम राखत महावितरणच्या अधिकृत माहितीनुसार सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शहरातील 'या' भागांना बसला मोठा फटका

सबस्टेशनमधील बिघाडामुळे आणि खबरदारीचा उपाय म्हणून केलेल्या वीज कपातीमुळे शहरातील प्रमुख भागांतील वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. यामध्ये चिंचवड, पिंपरी, थेरगाव, काळेवाडी, रहाटणी आणि पिंपळे सौदागर या दाट लोकवस्तीच्या परिसरांचा समावेश आहे.



## भूमिका

**सण, उत्सव आणि धार्मिक सोहळे हे भारतीय समाजजीवनाचे अविभाज्य अंग आहेत. या उत्सवांमध्ये प्रसाद, महाप्रसाद, भंडारा, लंगर, इफ्तार किंवा अन्य स्वरूपात मोठ्या प्रमाणावर अन्नवाटप केले जाते. श्रद्धेने दिलेले अन्न हजारो नागरिकांपर्यंत पोहोचते. त्यामुळे त्या अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता हा केवळ धार्मिकतेचा नव्हे, तर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे.**

# प्रसादाची श्रद्धा, सुरक्षिततेची जबाबदारी

सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या अन्नवाटपाची माहिती सात दिवस आधी अन्न व औषध प्रशासनाला देणे बंधनकारक करण्याचा निर्णय याच दृष्टिकोनातून पाहिला पाहिजे. पहिल्या नजरेत हा निर्णय उत्सवांमध्ये सरकारी हस्तक्षेप वाढविणारा वाटू शकतो. मात्र दूषित पाणी, निकृष्ट कच्चा माल, भेसळयुक्त तेल, अस्वच्छ स्वयंपाकाची जागा, चुकीची साठवणूक किंवा दीर्घकाळ उघडे ठेवलेले अन्न यापैकी एकही कारण शेकडो किंवा हजारो लोकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.



अन्नातून विषबाधा झाल्यानंतर जबाबदारी निश्चित करणेही सार्वजनिक अन्नवाटपाच्या बाबतीत कठीण असते. आयोजक, आचारी, कंत्राटदार आणि अन्नपुरवठादार यांच्यात जबाबदारीची टोलवाटोलवी होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रशासनाची देखरेख आवश्यक आहे. महत्त्वाचा मुद्दा मात्र अंमलबजावणीचा आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव किंवा अन्य धार्मिक कार्यक्रम अनेक दिवस चालतात. दररोज प्रसाद वाटप होत असेल, तर प्रत्येक वेळी स्वतंत्र अर्ज आणि परवानगी घेण्याची सक्ती आयोजकांसाठी जाचक ठरू शकते. त्याऐवजी संपूर्ण उत्सव कालावधीसाठी एकच नोंदणी करण्याची सुविधा असावी. आयोजकांनी संभाव्य दिवस, वेळा, लाभार्थ्यांची संख्या, अन्न तयार होण्याचे ठिकाण आणि कच्च्या मालाच्या पुरवठादारांची माहिती एकदाच दिली, तर प्रशासनालाही नियोजन करणे सोपे जाईल. अन्नवाटपाच्या स्वरूपानुसार नियमांमध्ये प्रमाणबद्धता असणेही गरजेचे आहे. काही मोजक्या लोकांना साखर, पेढे किंवा फळे वाटण्याच्या उपक्रमाला आणि हजारो नागरिकांसाठी महाप्रसाद आयोजित करणाऱ्या कार्यक्रमाला समान निकष लावणे व्यवहार्य नाही. छोट्या उपक्रमांसाठी साधी ऑनलाइन माहिती, तर मोठ्या महाप्रसादासाठी तपासणी आणि अधिक काटेकोर नियम अशी व्यवस्था असावी. अचानक आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांसाठी तातडीची ऑनलाइन नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून द्यावी.

एफडीएने केवळ नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यापुरती भूमिका मर्यादित ठेवू नये. मंडळे, धार्मिक संस्था आणि स्वयंसेवकांसाठी लघु प्रशिक्षण कार्यशाळा घेऊन सुरक्षित पाणी, स्वच्छता, अन्नाचे तापमान, साठवणूक, वाहतूक आणि उरलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट याबाबत मार्गदर्शन केले पाहिजे. आयोजकांना सोपी तपासणीसूची दिल्यास नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे होऊ शकते. अन्नाला धर्म नसतो आणि विषबाधाही धर्म पाहून होत नाही. त्यामुळे नियम सर्वांसाठी समान असणे आवश्यक आहे. मात्र या नियमांमुळे 'इन्स्पेक्टर राज' निर्माण होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी लागेल.

परवानगी प्रक्रिया मोफत, पारदर्शक, ऑनलाइन आणि सुटसुटीत असावी. श्रद्धेवर नियंत्रण ठेवणे हा उद्देश नसून श्रद्धेने वाटला जाणारा प्रसाद सुरक्षित ठेवणे हा हेतू स्पष्टपणे जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे. सण-समारंभातील आनंद अबाधित ठेवत नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे ही प्रशासन आणि आयोजक दोघांचीही सामायिक जबाबदारी आहे. प्रसाद श्रद्धेचा विषय आहे; पण त्याची शुद्धता आणि सुरक्षितता ही सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे नियम हवेतच—फक्त ते लोकाभिमुख, व्यवहार्य आणि पारदर्शक असावेत.

## प्रासंगिक »

### न्यायाची खरी ओळख

**एका गावात अमोल नावाचा पोलीस अधिकारी होता. एकदा एका गरीब शेतकऱ्याने गावातील श्रीमंत व्यक्तीविरुद्ध फसवणुकीची तक्रार केली. श्रीमंत व्यक्तीने अमोलवर दबाव आणण्यासाठी राजकीय ओळखीचा वापर केला.**

"ही तक्रार मागे घ्या, नाहीतर तुमची बदली होईल," असा इशाराही दिला. अमोल मात्र शांत राहिला. त्याने शेतकऱ्याची कागदपत्रे तपासली आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवले. चौकशीत श्रीमंत व्यक्तीने खरोखरच शेतकऱ्याची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. अमोलने कोणाचाही दबाव न मानता कायद्यानुसार कारवाई केली.

काही दिवसांनी शेतकरी अमोलला भेटला. त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. तो म्हणाला, "साहेब, माझ्याकडे पैसा नाही, मोठी ओळख नाही; पण तुमच्याकडून न्याय मिळेल, हा विश्वास होता." अमोल म्हणाला, "पोलीस वर्दी ही कोणाला घाबरवण्यासाठी नसते. ती प्रत्येक नागरिकाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी असते." हे ऐकून शेतकऱ्याने त्याला नमस्कार केला.

- तात्पर्य : **सत्तेच्या दबावापेक्षा कर्तव्य मोठे आणि ओळखीपेक्षा न्याय श्रेष्ठ असतो.**

लोकशाही व्यवस्थेत पोलीस यंत्रणा ही नागरिकांच्या सुरक्षेची हमी देणारी संस्था असते. कायदा-सुव्यवस्था राखणे, गुन्हे रोखणे आणि नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करणे ही तिची मूलभूत जबाबदारी आहे.

# वर्दीचा धाक आणि लोकशाहीची वाट

मात्र, अलीकडील काही घटनांमुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीविषयी गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सत्ताधाऱ्यांवर टीका करणाऱ्यांना ताब्यात घेणे, मध्यरात्री कारवाई करणे किंवा सामान्य नागरिकांना अपमानास्पद वागणूक देणे, अशा घटना लोकशाहीच्या आरोग्यासाठी निश्चितच चिंताजनक आहेत.



कायद्याची अंमलबजावणी करताना नियम सर्वांसाठी समान असणे अपेक्षित आहे. मात्र एखादा सामान्य नागरिक रस्त्यावर अडवला जातो आणि त्याचवेळी सत्तेतील व्यक्तींसाठी वाहतूक सुरळीत करण्यासाठी सामान्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केले जाते, तर प्रश्न निर्माण होतो तो पोलिसांच्या प्राधान्यक्रमाचा. कायदा हा व्यक्तीच्या पदानुसार, राजकीय जवळिकीप्रमाणे किंवा आर्थिक ताकदीनुसार बदलता कामा नये. पोलीस यंत्रणेवर अधिकार मोठे असतात; त्यामुळे त्या अधिकारांसोबत जबाबदारीही तितकीच मोठी असते.

एखाद्या नागरिकाला चौकशीसाठी ताब्यात घेताना कारण स्पष्ट करणे, त्याच्या मूलभूत अधिकारांचा आदर करणे आणि कायदेशीर प्रक्रिया पाळणे ही केवळ औपचारिकता नसून संविधानिक कर्तव्य आहे. अन्यथा पोलिसांबद्दलचा जनतेचा विश्वास कमी होतो. एकदा हा विश्वास ढासळला की कायदा-सुव्यवस्थेची संपूर्ण यंत्रणाच कमकुवत होते. पोलीस आणि सत्ताकेंद्रांमधील संबंध हाही तितकाच गंभीर विषय आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार असो, पोलीस यंत्रणा सत्ताधाऱ्यांच्या राजकीय सोयीचे साधन बनू नये. पोलिसांची निष्ठा व्यक्ती किंवा पक्षाशी नसून संविधान आणि कायद्याशी असली पाहिजे. 'वरून आदेश आला' हा अन्यायकारक कारवाईचा बचाव ठरू शकत नाही.यासोबतच पोलीस यंत्रणेच्या आर्थिक आणि प्रशासकीय स्वायत्ततेचाही प्रश्न आहे. उद्योगपती किंवा खासगी संस्थांकडून पोलीस ठाण्यांना सुविधा मिळणे वरकरणी सोयीचे वाटले तरी त्यातून भविष्यात हितसंबंधांचा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक संस्थांनी आवश्यक सुविधा मिळवण्यासाठी खासगी क्षेत्रावर अवलंबून राहणे ही दीर्घकालीन दृष्टीने योग्य व्यवस्था नाही. भारताला विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर केवळ मोठे महामार्ग, विमानतळ आणि उद्योग उभारून भागणार नाही.

नागरिकांना कायद्यापुढे समान वागणूक मिळणे, त्यांच्या स्वातंत्र्याचा आदर होणे आणि सरकारी यंत्रणांवर विश्वास कायम राहणे हेही विकासाचे महत्त्वाचे मापदंड आहेत.पोलीस सुधारणांवर अनेक दशके चर्चा झाली; आता कृतीची वेळ आली आहे. राजकीय हस्तक्षेपाला मर्यादा, पारदर्शक चौकशी, अधिकारांचा आदर आणि जनतेप्रती उत्तरदायित्व या चार बाबींवर ठोस सुधारणा झाल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही. वर्दी ही सत्तेची ताकद दाखवण्यासाठी नसून संविधानाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आहे. वर्दीतील अधिकार जर नागरिकांचा विश्वास वाढवण्याऐवजी भीती निर्माण करू लागले, तर विकासाची वाट खरोखरच धूसर होते.

## ।। अभंगवाणी ।।



न ये नेत्रां जळ ।
नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥

तों हे चावटीचे बोल ।
जन रंजवणें फोल ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज ठाकरेंचाही दणदणाटाला विरोध!

## सण-उत्सव पारंपरिक पद्धतीनेच साजरे करा; राज ठाकरेंचा पदाधिकाऱ्यांना कानमंत्र

**महाईन्यूज । मुंबई**

**आपण सणांमध्ये डॉल्बी, डीजे का लावताय, सण पारंपारिक पद्धतीने का साजरा होत नाही. उत्तरेतील संस्कृती महाराष्ट्रात का आणत आहोत, गोविंदाच्या मंचावर नाच केले जातात. हा प्रकार उत्तर भारतातील आहे. आपण कोण आहोत, महाराष्ट्राचा इतिहास मोठा आहे. हा महाराष्ट्र उत्तरेचे का अनुकरण करत आहे. सण कसे साजरे करावे यासाठी काही नियमावली असली पाहिजे असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले.**



सण-उत्सवांच्या काळात डीजे आणि डॉल्बीच्या मोठ्या आवाजाला विरोध होत असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनीही सणांमध्ये होणाऱ्या ध्वनिप्रदूषणावर ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये पदाधिकारी मेळाव्यात भूमिका मांडली. आपण सणांमध्ये डॉल्बी आणि डीजे का लावत आहोत? सण पारंपरिक पद्धतीने का साजरे होत नाहीत?' असा सवाल राज ठाकरे यांनी केला. सण साजरे करण्याची पद्धत बदलत चालली असून, त्यामध्ये इतर राज्यांतील संस्कृतीचे अनुकरण केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. डीजेबंदी विषयी पुण्यात वाद सुरु आहेत. नागपूरात डीजे बंद आहे. परंतु महाराष्ट्रात सुरु असा सवालही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केला.

शाळेबाहेरील पान टपरीवर अमली पदार्थ मिळत आहेत.जंगल तोड होत आहे, जमीनी घेतल्या जात आहेत. ज्यांच्या जमीनी गेल्यात त्यांना नोकऱ्या मिळत नाही. भाजपच्या लोकांना देशाची परिस्थिती माहित आहे. परंतु ते बोलू शकत नाहीत असेही राज ठाकरे म्हणाले. धर्मांधपणा खड्ड्यातच घेऊन जाणार. आपला देश मागे जात आहे अशी टीका देखील त्यांनी केली.

"आपण उत्तरेतील संस्कृती महाराष्ट्रात आणतोय का? आता इथे गोविंदाच्या वेळेला महिलांना व्यासपीठावर आणून नाचायचं. हे सर्व उत्तरेत चालतं. ते आपण महाराष्ट्रात आणतोय का? आपण त्यांना शिकवायचं की आपण त्यांचं घ्यायचं? कोण आहोत आपण? काय आहे महाराष्ट्राचा इतिहास? महाराष्ट्राने किती गोष्टी शिकवल्या? मध्यंतरी महाराष्ट्राचं रुप दाखवलं होतं, माणसं कशी होऊ गेली आपल्याकडे. हा महाराष्ट्र त्यांचं अनुकरण करतोय? सण कशाप्रकारे साजरा व्हायला हवा? आपण आपल्या संस्कृतीप्रमाणे साजरा केला पाहिजे", असं आवाहनही राज ठाकरेंनी केलं.

"या आवाजामुळे अनेकांचे डोळे, कान गेले. जरा तरी हृदयाचा त्रास असेल तर या आवाजाने माणूस मरू शकेल. कुठे आणून ठेवलाय आपण सण? टिळकांनी कशासाठी गणेशोत्सव सुरू केला? तुम्ही धर्मामध्ये बेभान होऊ नये. उत्सव इथपर्यंत ठीक आहे. धर्मांधपणा खड्ड्यातच घेऊन जाणार. जे देश धर्माच्या नावाखाली उभे राहत होते, ते देश पुढे चालले आहेत आणि आपण मागे चाललो आहोत", अशी टीकाही राज ठाकरे यांनी केली.

### विसर्जनाला कसला आनंद होतोय?

इतक्या श्रद्धेने गणपती घरी आणायचा. आणि विसर्जन करताना नाचता? कसला आनंद होतोय? यात कसला आनंद साजरा करताय? माझ्या घरी दीड दिवसांचा गणपती येतो. मुलांसाठी मी आणला. ज्यावेळी गणपती जातो तेव्हा ओकंबोकं वाटतं घर. उत्साह गेल्यासारखा वाटतं. वाईट वाटतं त्यावेळेला. मग वाईट वाटण्याऐवजी कसला उत्साह साजरा करताय? असं राज ठाकरे म्हणाले.

---

# हात जोडून सांगते, अजित पवारांच्या अपघातावर बोलणार नाही; सुप्रिया सुळे

**महाईन्यूज । बीड**

**अजित पवारांच्या अपघातावर बोलणार नाही; सुप्रिया सुळेंचं मोठं भाष्यमाजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप अद्यापही सुरूच आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांच्या विमान अपघाताचा एफआयआर दाखल न झाल्याच्या मुद्यावरून प्रश्न उपस्थित केले होते. इतर प्रकरणांमध्ये तातडीने गुन्हे दाखल केले जातात. मात्र, अजित पवारांच्या अपघाताला इतके महिने होऊनही गुन्हा दाखल झालेला नाही, असं म्हणत सुळेंनी नाराजी व्यक्त केली होती. त्यांच्या या वक्तव्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रत्युत्तर देत "अजित पवारांच्या अपघाताचं राजकारण करू नये", असं म्हटलं होतं.**



सुनेत्रा पवार यांच्या या वक्तव्यानंतर आता सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एक मोठं वक्तव्य करत आता आपण या मुद्द्यावर अधिक भाष्य करणार नसल्याचं सांगितलं आहे. अजित पवारांच्या अपघाताबाबत यापुढे आपण बोलणार नाही, असं सुप्रिया सुळे यांनी आज (६ सप्टेंबर) माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात सुप्रिया सुळे यांनी केलेल्या वक्तव्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया देत अशा गोष्टी करुन मीडिया ट्रायल होते की काय असं वाटतं, असं म्हटलं होतं. सुनेत्रा पवारांच्या या वक्तव्याबाबत पत्रकारांनी आज सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "माझी हात जोडून विनंती आहे, त्यांच्यावर आम्ही कोणीही बोलणं, मी देखील आजपासून या विषयावर बोलणं बंद केलं आहे", असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो हटवला म्हणून अमित ठाकरे यांच्यावर तुम्ही एफआयआर दाखल करता. मात्र, माझ्या भावाचा विमान अपघात झाला, माझा भाऊ सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होता, पण तरीही आजपर्यंत या सरकारने एफआयआर दाखल केला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सरकारचा भाग आहे की नाही? त्यांचे ४० आमदार आहेत की नाही? त्या ४० आमदारांनी किंवा त्यांच्या मंत्र्यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत एक शब्द तरी काढला का?", असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं होतं.

### सुनेत्रा पवार काय म्हणाल्या होत्या?


"खरं सांगायचं तर आदरणीय अजित पवार गेल्यानंतर मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आमच्यावर आकाश कोसळलं, ते माझ्या आणि माझ्या मुलांपेक्षा जास्त कोणाला माहिती असणार? या घटनेच्या संदर्भात पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटी आम्ही घेतल्या आहेत. तपास यंत्रणा देखील त्यांचं काम करत आहेत. त्यामुळे मला वाटतं की आपण तपास यंत्रणांना वेळ दिला पाहिजे. फक्त सतत मीडियात येणं म्हणजेच अपडेट मिळणं असं नाही. मला वाटतं की वारंवार अशा गोष्टी करुन मीडिया ट्रायल होते की काय असं वाटतं. खरंतर सर्वांनी विचार केला पाहिजे", असं सुनेत्रा पवारांनी म्हटलं होतं.

# अमेरिका-इराण युद्ध पुन्हा भडकलं!

## खर्ग बेटाजवळ तेलाच्या ३ इराणी टँकर्सवर अमेरिकेचा भीषण हल्ला

**महाईन्यूज । नेपाळ**

**अमेरिका आणि इराणमधील संघर्ष दिवसेंदिवस आणखी वाढताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका-इराणमधील शस्त्रसंधी संपुष्टात आल्याची घोषणा केली होती, त्यानंतर या दोन्ही देशातील संघर्ष पुन्हा एकदा वाढला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीमध्येही मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाल्यामुळे जागतिक व्यापारालाही अडथळे निर्माण होत आहे. याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे.**




२८ फेब्रुवारीपासून पश्चिम आशियात धगधगत असलेल्या युद्धाला आता ६ महिने पूर्ण झाले आहेत. मात्र, अद्यापही या युद्धाबाबत कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. आता अमेरिका-इराण युद्ध पुन्हा एकदा भडकलं आहे. इराणने अमेरिकी नौदलाच्या युद्धनौकांना लक्ष्य केल्यानंतर अमेरिकेने ३ इराणी तेलवाहू टँकर्सवर भीषण हल्ला केला असल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने याबाबत माहिती दिली आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने एक्सवरील एका पोस्टच्या माध्यमातून सांगितलं की, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (IRGC) प्रादेशिक सागरी हद्दीत गस्त घालत असलेल्या अमेरिकी नौदलाच्या दोन युद्धनौकांवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागल्यानंतर आता अमेरिकी सैन्याने शनिवारी तीन इराणी तेलवाहू टँकर्सवर हल्ला केला आहे.

इराणच्या हल्ल्याच्या प्रयत्नानंतर अमेरिकी सैन्याने इराणच्या खर्ग बेटाच्या किनाऱ्याजवळ दोन इराणी कच्च्या तेलाची टँकर्स नष्ट केली आहेत. ओमानच्या आखातात आणखी एक न भरलेला टँकरही निकामी करण्यात आला. यामध्ये अमेरिकेचे कोणतेही कर्मचारी जखमी झाले नाहीत, असं सेंट्रल कमांडने म्हटलं आहे.

दरम्यान, सेंट्रल कमांडचे कमांडर ॲडमिरल ब्रॅड कूपर यांनी म्हटलं की, “आयआरजीसी साठी हा संदेश आहे की, जर तुम्ही आमच्या दोन जहाजांवर हल्ला केला, तर आम्ही तुम्हाला त्याहून अधिक मोठी आर्थिक किंमत मोजायला लावू, म्हणजेच तुमची तीन जहाजे नष्ट करू. आम्ही अमेरिकी सैन्याच्या संरक्षणासाठी मागेपुढे पाहणार नाही. गरज पडल्यास इराणच्या मर्यादित व असुरक्षित तेलवाहू जहाजांच्या ताफ्याचा नायनाट करू”, असं त्यांनी म्हटलं आहे.

# सुभाष चंद्रा यांच्यावर सीबीआयची कारवाई, एफआयआर दाखल

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**‘झी’ समूहाचे संस्थापक आणि ‘एस्सेल समूहा’चे अध्यक्ष सुभाष चंद्रा यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडची (LICHFL) १,३२२ कोटी रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) सुभाष चंद्रा यांच्यासह अनेक कंपन्या आणि त्यांच्या संचालकांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. स्वतःची संपत्ती फुगवून दाखवत कर्ज मिळवले आणि नंतर ते फेडले नाही, असा प्राथमिक आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.**






सीबीआयच्या ‘बँकिंग सिक्युरिटीज फ्रॉड शाखे’ने ३१ ऑगस्ट रोजी याप्रकरणी एफआयआर नोंदवला. एलआयसी हाऊसिंग फायनान्सच्या महाव्यवस्थापक नीता मेंघाणी यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. २०१८ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या दोन वेगवेगळ्या कर्जप्रकरणांमध्ये चंद्रा यांनी वैयक्तिक हमी दिली होती. मात्र हे कर्ज थकित राहिल्याने सार्वजनिक क्षेत्रातील या वित्तीय संस्थेला व्याज आणि इतर शुल्कासह १,३२२ कोटी रुपयांपेक्षा अधिक नुकसान सहन करावे लागले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सीबीआयने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये सुभाष चंद्रा यांच्याव्यतिरिक्त वसंत सागर प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड आणि तिचे संचालक पंकज सुरोलिया, पॅन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, डिजिटल सबस्क्रायबर मॅनेजमेंट अँड कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. आणि तिचे संचालक अमिश पंड्या, स्पिरिट इन्फ्रा पॉवर अँड मल्टी व्हेंचर्स प्रा. लि. आणि तिचे संचालक राजीव ढोलकिया यांचा समावेश आहे. याशिवाय काही अज्ञात सरकारी अधिकारी आणि इतरांविरुद्धही गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या दोन्ही कर्जांसाठी सुभाष चंद्रा यांनी ‘कंटिन्युईंग गॅरंटी’ दिली होती. पहिली हमी २८ मार्च २०१८ रोजी आणि दुसरी हमी १० ऑगस्ट २०१८ रोजी देण्यात आली होती.

### दोन टप्प्यांत ९८० कोटींचे कर्जवाटप

नीता मेंघाणी यांच्या तक्रारीनुसार, एलआयसी हाऊसिंग फायनान्सने २०१८ मध्ये दोन स्वतंत्र कर्जसुविधा मंजूर केल्या होत्या. वसंत सागर प्रॉपर्टीज प्रा. लि. आणि पॅन इंडिया इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांना ५०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. डिजिटल सबस्क्रायबर मॅनेजमेंट अँड कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. आणि स्पिरिट इन्फ्रा पॉवर अँड मल्टी व्हेंचर्स प्रा. लि. यांना ४८० कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले होते.

# ‘हनुमान अंश’ने रचला नवा इतिहास!



रॉकिंग स्टार यशच्या ‘टॉक्सिक’ची जोरदार चर्चा सुरू असतानाच कमी बजेटमध्ये तयार झालेल्या ‘हनुमान अंश’ या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अनपेक्षित कामगिरी केली आहे. प्रदर्शनाच्या सुरुवातीच्या दिवसांत या चित्रपटाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नव्हता. मात्र, आता रिलीजला एक महिना पूर्ण झाल्यानंतर चित्रपटाच्या कमाईने मोठा टप्पा ओलांडला असून नवा इतिहास रचला आहे.

‘हनुमान अंश’ने अनेक मोठ्या चित्रपटांना कमाईच्या बाबतीत मागे टाकत बॉक्स ऑफिसवर आपली पकड मजबूत केली आहे. प्रेक्षकांकडून मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत असून चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांची गर्दी पाहायला मिळत आहे.

नीम करोली बाबांच्या जीवनावर आधारित असलेला हा चित्रपट रिलीजच्या ३१ व्या दिवशी म्हणजेच रविवारीही बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई करत आहे. Sacnilkच्या आकडेवारीनुसार, चित्रपटाने भारतात आतापर्यंत ११७.४६ कोटी रुपयांचे ग्रॉस कलेक्शन, तर ९९.२९ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. रविवारच्या अंतिम कमाईचे आकडे अद्याप समोर येणे बाकी आहे.

विशेष म्हणजे, केवळ १.८ कोटी ते २ कोटी रुपये इतके अंदाजे बजेटमध्ये तयार झालेल्या ‘हनुमान अंश’ने कमाईचा मोठा टप्पा पार करत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. या चित्रपटाची कामगिरी सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.


‘हनुमान अंश’ ७ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी चित्रपटाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. रिलीजच्या पहिल्या दिवशी चित्रपटाने केवळ १० लाखांची कमाई केली होती.

मात्र, चित्रपटाच्या भक्तिपूर्ण कथानकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळू लागला आणि त्याची तोंडी प्रसिद्धी वाढत गेली. याचा थेट फायदा चित्रपटाच्या कमाईला झाला. तिसऱ्या आठवड्यापासून ‘हनुमान अंश’ने बॉक्स ऑफिसवर वेग पकडला आणि त्यानंतर चित्रपटाच्या कमाईत सातत्याने वाढ होत गेली आणि ती अजूनही कायम आहे.



# कंगनाचा पारा चढला!

अभिनेत्री कंगना रणौत पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. कृष्णजन्माष्टमीच्या निमित्ताने तिने सोशल मीडिया अकाऊंटवरून एक व्हिडिओ शेअर केला होता. या व्हिडिओवरून काही नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं. त्यानंतर कंगनानेही ट्रोलर्सना कडक शब्दांत प्रत्युत्तर दिलं आहे. कंगना रणौत ही विविध कारणांमुळे सतत चर्चेत असते. तिच्या वक्तव्यांवर सोशल मीडियावर लगेच प्रतिक्रिया उमटतात. याआधीही तिची अनेक वक्तव्ये वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. दरम्यान, कृष्णजन्माष्टमीनिमित्त कंगना घरातील स्वयंपाकघरात उपवासाचा पदार्थ तयार करताना दिसत आहे. हा व्हिडिओ तिने तिच्या ‘एक्स’ अकाऊंटवरून शेअर केला आहे. मात्र, व्हिडिओमध्ये ती पदार्थ बनवत असताना गॅसचे बटन बंद असल्याचे दिसत असल्याने काही नेटकऱ्यांनी तिच्यावर टीका केली. एका ट्रोलरने कंगनाच्या व्हिडिओवर कमेंट करत म्हटलं, “गॅस पेटव, नाटकबाज राणी, आणि बघ तवा किती काळा झाला आहे.” या टीकेला कंगनाने स्पष्टीकरण देत उत्तर दिलं. “हा साधा हलवा नाही, तर ‘भोग’ आहे. यात अनेक घटक वेगवेगळे तयार करून नंतर एकत्र मिसळले जातात. यानंतर ते सेट होण्यासाठी ठेवले जाते आणि मग त्याचे तुकडे केले जातात,” असं तिने म्हटलं. पुढे कंगनाने ट्रोलरला प्रत्युत्तर देताना लिहिलं, “जे आपल्या आई-वडिलांवर आणि पृथ्वीवर ओझे आहेत, त्यांच्याकडून स्वयंपाकाची कला असण्याची अपेक्षा करता येत नाही. फक्त अन्नावर लक्ष केंद्रित करा, स्वयंपाकाची चिंता करू नका.” कंगनाच्या या प्रत्युत्तरानंतर सोशल मीडियावर पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे.



# ‘असुर 3’मध्ये अहसास चन्नाची एन्ट्री!

ओटीटीवरील ‘असुर’ या क्राइम थ्रिलर आणि सस्पेनसने भरलेल्या मालिकेला मोठा प्रतिसाद मिळाला. या मालिकेच्या दुसऱ्या सीझननंतर तिसरा सीजन लवकरच येत असून, त्याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. अरशद वारसी आणि बरुण सोबती यांच्या या मालिकेत एका प्रसिद्ध अभिनेत्रीची एन्ट्री झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ‘गर्ल्स हॉस्टल’,’कोटा फैक्ट्री’ आणि ‘हॉस्टल डेज’ यांसारख्या प्रोजेक्ट्समध्ये झळकणारी अभिनेत्री अहसास चन्ना या सीरिजमध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे. परंतु याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. मिडिया रिपोर्टनुसार, अहसासने ‘असुर ३’च्या तिसऱ्या सीझनच्या चित्रीकरणाला सुरुवात केली आहे. या वर्षी डिसेंबरपर्यंत चित्रीकरण पूर्ण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, येत्या २०२७ पर्यंत ही सीरिज प्रदर्शित करण्याचा निर्मात्यांचा विचार आहे. दरम्यान, अहसास चन्नाने या लोकप्रिय सीरिजचा भाग झाल्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अभिनेत्री म्हणाली, “मी या सीरिजची खूप मोठी चाहती आहे. अर्शद वारसी सर, बरुण सोबती आणि रिद्धी डोगरा यांसारख्या अप्रतिम कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळणे हे एक स्वप्न आहे.” ‘असुर’च्या पहिल्या दोन सीझनचं दिग्दर्शन ओनी सेन यांनी केलं होतं. तर आता तिसऱ्या सीझनच्या दिग्दर्शनाची धुरा गौरव शुक्ला सांभाळणार आहेत. त्यांनी सीरिजचं लेखन आणि क्रिएटर म्हणून काम पाहिलं आहे. यात अहसास चन्ना आता अरशद वारसी, बरुण सोबती, रिद्धी डोगरा, अनुप्रिया गोयनका, विशेष बंसल आणि श्वेता बसू प्रसाद यांसारख्या शानदार कलाकारांच्या टीमचा भाग बनणार आहे.

# इशान किशनच्या बॅटमधून धावांचा पाऊस

## इशान किशनचे वादळी शतक; प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ४००० धावांचा टप्पा पार

**महाईन्यूज । चेन्नई**

**येथील एम. ए. चिदंबरम (चेपॉक) स्टेडियमवर पूर्व विभाग (ईस्ट झोन) आणि दक्षिण विभाग (साउथ झोन) यांच्यात रंगलेल्या दुलीप करंडक २०२६ च्या अंतिम सामन्यावर पूर्व विभागाने पहिल्याच दिवशी आपली मजबूत पकड मिळवली आहे. पूर्व विभागाचा कर्णधार इशान किशन याने पहिल्या डावात कर्णधारी खेळीचे प्रदर्शन करत शानदार शतक झळकावले. पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा इशान १११ धावांवर नाबाद परतला. या खेळीदरम्यान त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आपल्या ४ हजार धावांचा महत्त्वाचा टप्पाही यशस्वीरीत्या ओलांडला.**




इशान किशनने आतापर्यंत ६७ प्रथम श्रेणी सामन्यांच्या १०९ डावांत सुमारे ४० च्या सरासरीने एकूण ४०६० धावा जमवल्या आहेत. यामध्ये १० शतके आणि १९ अर्धशतकांचा समावेश असून, २७३ ही त्याची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर कसोटी क्रिकेटमध्ये इशानला आतापर्यंत केवळ दोन सामने खेळण्याची संधी लाभली आहे; ज्यामध्ये तीन डावांत त्याने एका अर्धशतकासह ७८.०० च्या सरासरीने ७८ धावा केल्या आहेत. आता देशांतर्गत लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये केलेल्या या दमदार कामगिरीनंतर त्याचे भारतीय कसोटी संघात पुनरागमन होते का, याकडे क्रीडा विश्वाचे लक्ष लागले आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पूर्व विभागाची धावसंख्या १४७ असताना तिसरी विकेट पडली आणि त्यानंतर कर्णधार इशान किशन मैदानात उतरला. त्याने संयमी पण आक्रमक खेळ करत अवघ्या ७१ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने चौथ्या विकेटसाठी शिखर मोहन (८५ धावा) याच्या साथीने ९४ धावांची अत्यंत मोलाची भागीदारी रचली. दिवसाच्या शेवटच्या सत्रात या यष्टिरक्षक-फलंदाजाने उत्कृष्ट फलंदाजीचे दर्शन घडवत शतक साकारले.

### अंतिम सामन्याच्या पहिला दिवस

दुलीप करंडक २०२६ च्या या अंतिम सामन्यात पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत पूर्व विभागाने दक्षिण विभागाविरुद्ध ४ गड्यांच्या मोबदल्यात ३८५ धावांचा डोंगर उभारला आहे. चेपॉक स्टेडियमवर कर्णधार इशान किशनच्या (नाबाद १११) शतकाव्यतिरिक्त, कुमार कुशाग्र ६३ धावांवर नाबाद खेळत असून या दोघांची भागीदारी मैदानावर कायम आहे. दक्षिण विभागाकडून चामा व्ही. मिलिंद हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला.

# चीनच्याच भूमीत सात्विक-चिरागने पटकावले 'चायना मास्टर्स'

**महाईन्यूज । बेंगळुरू**

**भारताची स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी अटीतटीच्या अंतिम सामन्यात जबरदस्त पुनरागमन करत चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रविवारी झालेल्या तीन गेम्सच्या थरारक लढतीत भारतीय जोडीने चीनच्या हे जी टिंग आणि रेन शियांग यू या जोडीचा पराभव करत जेतेपदावर आपले नाव कोरले.**




नाणेफेक जिंकून बाजू निवडणाऱ्या भारतीय जोडीची सुरुवात अत्यंत खराब झाली. चिनी जोडीने सुरुवातीलाच ५-० अशी आघाडी घेतली. हे जी टिंगच्या तुफान स्मॅश आणि आक्रमक खेळापुढे भारतीय बचाव निष्प्रभ ठरला. मध्यंतरापर्यंत ७-१४ अशी पिछाडीवर पडलेल्या सात्विक-चिरागला पहिला गेम ११-२१ असा गमवावा लागला.'

दुसऱ्या गेममध्ये सात्विक-चिरागने आपल्या रणनीतीत बदल केला. त्यांनी अप्रतिम बचाव करत रॅलीज लांबवल्या. सात्विकच्या फ्लिक सर्व्ह आणि चिरागच्या बॉडी स्मॅशमुळे भारतीय जोडीने ११-७ अशी मध्यंतराला आघाडी घेतली. १२-८ च्या स्कोअरवर झालेली ४५-शॉट्सची रॅली जिंकून भारतीय जोडीने सामन्यावर पकड मजबूत केली आणि अखेर हा गेम २१-१३ ने जिंकून सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली.

निर्णायक गेममध्ये चिनी जोडीने ४-० अशी आघाडी घेतली होती, पण सात्विक-चिरागने चिकाटी दाखवत स्कोअर ७-७ असा बरोबरीत आणला. मध्यंतराला चिनी जोडी ११-९ ने पुढे होती. परंतु, १६-१६ च्या बरोबरीनंतर भारतीय जोडीने आक्रमक खेळ करत १८-१७ अशी आघाडी घेतली. त्यानंतर सात्विक-चिरागला तीन मॅच पॉईंट्स मिळाले आणि चिरागने मारलेल्या दमदार स्मॅशवर भारताने २१-१७ असा गेम जिंकत चषक आपल्या नावे केला.

या विजयासह सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी आपल्या दमदार खेळाची पुन्हा एकदा छाप पाडली. निर्णायक क्षणी दाखवलेली संयमी वृत्ती आणि आक्रमक खेळ भारताच्या विजयात निर्णायक ठरला. या शानदार विजयामुळे भारतीय जोडीच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, देशभरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या विजयामुळे सात्विक-चिरागच्या शिरपेचात आणखी एका मोठ्या जेतेपदाची भर पडली आहे. भारताच्या या स्टार जोडीने दबावाच्या क्षणी दाखवलेली जिद्द आणि शानदार फिनिशिंग त्यांच्या विजयाचे वैशिष्ट्य ठरले.

### तिसऱ्या प्रयत्नात सात्विक-चिरागचे स्वप्न पूर्ण

२०२३ आणि २०२५ च्या मोसमात उपविजेतेपदावर समाधान मानावे लागलेल्या सात्विक-चिरागने तिसऱ्या प्रयत्नात हे स्वप्न पूर्ण केले. १ तास १० मिनिटे चाललेल्या या महामुकाबल्यात भारतीय जोडीने माजी जागतिक ४ थ्या क्रमांकाच्या चिनी जोडीचा ११-२१, २१-१३, २१-१७ असा पराभव केला. सात्विक-चिरागचे या हंगामातील हे दुसरे विजेतेपद ठरले असून, यापूर्वी त्यांनी सिंगापूर ओपन सुपर ७५० चे विजेतेपद आणि थायलंड ओपन सुपर ५०० चे उपविजेतेपद पटकावले होते. १९ सप्टेंबरपासून जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाचा बचाव करण्यासाठी उतरण्यापूर्वी जागतिक क्रमवारीत ५ व्या स्थानावर असलेल्या या जोडीसाठी हा विजय मोठा आत्मविश्वास देणारा ठरणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
ePaper
। सोमवार ।
दि. 07 सप्टेंबर 2026 ।



# थेरगाव केजुदेवी उद्यान आणि बंधारा विकासाला मंजुरी

## ‘वनगंध’ प्रकल्पांतर्गत साकारणार जलक्रीडा पर्यटन केंद्र; अभिषेक बारणे यांची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात मानाचा तुरा रोवणारा आणि सौंदर्यात भर घालणारा ‘वनगंध’ हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प नागरिकांच्या भेटीला येत आहे. या प्रकल्पांतर्गत थेरगाव येथील बोट क्लब व केजुदेवी उद्यानाच्या नूतनीकरणाच्या कामाच्या नावामध्ये सुधारणा करून तिथे जलक्रीडा पर्यटन विकसित करण्यास स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.**



स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या मान्यतेने या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकतीच अभिषेक बारणे यांनी या प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्प विकासाची सविस्तर माहिती घेतली. तसेच, संबंधित विभागाला आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना केल्या. या प्रकल्पाच्या पाहणी दौऱ्याप्रसंगी सिद्धेश्वर बारणे, ‘मे. शिल्पी आर्किटेक्ट्स अँड प्लॅनर्स’चे वास्तुविशारद पारस एस. नेत्रगावकर हे देखील उपस्थित होते.

शहरातील नागरिकांना निसर्ग, पाणी आणि सार्वजनिक जीवनाशी जोडणारा सर्वसमावेशक परिसर या प्रकल्पातून निर्माण केला जात आहे. नदी नागरिकांसाठी खुली करणे आणि वनातून फेरफटका मारण्याचा अनुभव देणारे सार्वजनिक केंद्र निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पाची रचना मनोरंजन, पर्यावरण आणि संस्कृती यांच्या मिलाफातून करण्यात आली असून, येथे येणाऱ्या नागरिकांसाठी भव्य प्रवेशद्वार, आगमन क्षेत्र आणि सुसज्ज पार्किंगची व्यवस्था असणार आहे.

या प्रकल्पाच्या मुख्य आकर्षणांमध्ये ॲम्फीथिएटर, समुदाय बैठक व्यवस्था, फोटो बूथ, मचान, तसेच बोटिंग जेट्टी, फेरी बोट आणि विविध जलक्रीडांचा (वॉटर स्पोर्ट्स) समावेश आहे. याशिवाय आरोग्य आणि विहारासाठी जॉगिंग ट्रॅक, मुलांचे खेळण्याचे क्षेत्र, निसर्गवाटा (नेचर ट्रेल्स), पुष्पोद्यान, इको पार्क, वॉच टॉवर, सांस्कृतिक उपक्रमांसाठी विशेष जागा, विलोभनीय घाट आणि एक मंदिर परिसर उभारला जाणार आहे.

निसर्ग सफर, विपुल हिरवाई आणि विविध सार्वजनिक उपक्रमांचा सुंदर मेळ या प्रकल्पात पाहायला मिळणार आहे. हा परिसर केवळ एक पारंपारिक उद्यान न राहता, नदी, निसर्ग आणि समाज यांच्यात निरंतर संवाद साधणारे एक चैतन्यपूर्ण शहरी केंद्र म्हणून आकार घेणार असून, लवकरात लवकर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

> “पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा आणि उत्तम विरंगुळा केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. थेरगाव येथील ‘वनगंध’ प्रकल्पामुळे केवळ नदीचे सौंदर्य वाढणार नाही, तर याठिकाणी नागरिकांसाठी जलक्रीडा पर्यटनाचा एक नवीन आणि उत्कृष्ट पर्याय उपलब्ध होईल. हा प्रकल्प नदी, निसर्ग आणि समाज यांना जोडणारा एक आदर्श ठेवा ठरेल.
>
> **- अभिषेक बारणे, सभापती – स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# माई सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षपदी अनुराधा विशाल काळभोर यांची निवड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महिला व युवतींमध्ये सामाजिक कार्याची आवड निर्माण करण्याबरोबरच जलसंवर्धन, पर्यावरण संवर्धन, संस्कृतीचे जतन, पारंपरिक सण-उत्सवांचे संवर्धन आणि महिलांच्या आर्थिक विकासाला चालना देण्याच्या व्यापक उद्देशाने काळभोरनगर येथे ‘माई सोशल फाऊंडेशन’ची स्थापना करण्यात आली. गोकुळाष्टमीच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या या स्थापना सभेत फाऊंडेशनच्या अध्यक्षपदी अनुराधा विशाल काळभोर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.**



विविध वाद्य-संगीताच्या प्रशिक्षक तथा संगीत विशारद प्रांजली पाटेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. महिलांना सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धन व पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती, भारतीय संस्कृती व पारंपरिक सण-उत्सवांचे जतन, तसेच महिलांसाठी गृहउद्योग व कुटिरोद्योगाच्या संधी निर्माण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. महिलांमधील कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठीही विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

अध्यक्षीय भाषणात प्रांजली पाटेकर म्हणाल्या, “प्रत्येक महिलेमध्ये काही ना काही कलागुण दडलेले असतात. महिलांनी आपल्या कलागुणांना समाजासमोर आणून विविध छंद जोपासले पाहिजेत. त्यातून स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकास साधण्याबरोबरच समाजाच्या प्रगतीतही योगदान देता येते.”

नवनिर्वाचित अध्यक्षा अनुराधा विशाल काळभोर यांनी फाऊंडेशनच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. महिलांना स्वावलंबी करण्यासाठी तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात वाढदिवस असलेल्या महिला सदस्यांचे वाढदिवस उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सभेचे नियोजन सोनाली काळे, नेहा कालेकर, प्राची काळभोर आणि शिल्पा भालेराव यांनी केले.

# हिंजवडी आयटी कर्मचाऱ्यांचा मूक मोर्चा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

हिंजवडी आयटी पार्कमधील रस्ते, वाहतूककोंडी, पाणीपुरवठा, वीज, कचरा व्यवस्थापन आणि मेट्रोच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आयटी कर्मचाऱ्यांनी रविवारी मूक मोर्चा काढला. 'स्मार्ट आयटी सिटी संकल्प'च्या माध्यमातून काढण्यात आलेल्या या मोर्चा आयटी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हिंजवडी फेज-१ येथील इन्फोसिस सर्कलपासून मोर्चाला सुरुवात झाली. हातात मागण्यांचे फलक घेऊन कर्मचारी यामध्ये सहभागी झाले होते.

या वेळी शिवसेनेचे सचिव सूरज चव्हाण, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन पडवळ, पुणे जिल्हाप्रमुख प्रकाश भेगडे, रामदास धनवटे, पुणे शहरप्रमुख वसंत मोरे, पिंपरी-चिंचवड शहरप्रमुख चेतन पवार, सहसंपर्कप्रमुख गजानन थरकुडे, संजय मोरे, आमदार शंकर मांडेकर, शंकर जगताप, हिंजवडीचे सरपंच गणेश जांभुळकर, माजी सरपंच शाम हुलावळे यांसह आयटी फोरमचे अध्यक्ष पवनजीत माने, ज्ञानेंद्र हुलसुरे, पुष्कराज निंबाळकर आदी उपस्थित होते.

हिंजवडीतील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्यांची दुरवस्था हा आयटी कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन प्रवासातील प्रमुख प्रश्न आहेत. मेट्रो लवकर धावेल याबाबत वारंवार अशवासने, त्यात मेट्रोच्या कामामुळे निर्माण झालेला राडारोडा, धूळ आणि वाहतुकीतील अडथळ्यांची भर पडल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. अनेक सोसायट्यांमध्ये पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायम असून, टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याची तक्रारही कर्मचाऱ्यांनी केली.

रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसोबतच वीज, कचरा व्यवस्थापन, पादचारी सुविधा आणि सार्वजनिक वाहतुकीच्या प्रश्नांकडेही मोर्चाच्या माध्यमातून लक्ष वेधण्यात आले. आयटी पार्कमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असताना त्या तुलनेत नागरी सुविधांचा विकास झालेला नसल्याची भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

# आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट

## हॉटेल उद्योगात उज्ज्वल भविष्याची मुहूर्तमेढ: आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल मॅनेजमेंट हे क्षेत्र आजच्या काळात जगभरात वेगाने वाढणाऱ्या आणि सर्वाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या प्रमुख क्षेत्रांपैकी एक ठरत आहे. या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींच्या आकांक्षांना योग्य दिशा देऊन त्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण पुरवण्यात 'आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट' ही अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपाला आली आहे.**




प्रतीक्षा डफळ मॅडम या स्वतः 'ब्लॅक बेल्ट कराटे' विजेत्या आहेत. क्रीडा क्षेत्रात मुलींच्या विकासासाठी त्या सातत्याने एकनिष्ठेने कार्यरत आहेत. वाढते अत्याचार आणि सुरक्षिततेचे प्रश्न लक्षात घेता, त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यात आत्मसंरक्षणाचे धडे देतात. मुलींना केवळ सक्षम बनवणेच नव्हे, तर त्यांना थेट परदेशात नोकरी मिळवण्यासाठी आत्मविश्वासाने तयार करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. संस्थेच्या सततच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भाग आणि सर्व स्तरांतील मुला-मुलींना आपल्या पायावर उभे राहण्याची संधी मिळत आहे. येथील विद्यार्थ्यांना देश-विदेशातील ५-स्टार व ७-स्टार हॉटेल्स, लक्झरी क्रूझ लाईन्स आणि कॉर्पोरेट क्षेत्रात इंटर्नशिप व रोजगाराच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध होत आहेत. आज या संस्थेतून घडलेले अनेक विद्यार्थी जगभरातील आघाडीच्या हॉटेल्स आणि क्रूझ शिपवर यशस्वीरीत्या कार्यरत आहेत.

हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात आपले आंतरराष्ट्रीय करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आय आय बी एम कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट आणि प्रतीक्षा डफळ यांचे मार्गदर्शन हे एक भक्कम आणि विश्वासार्ह व्यासपीठ ठरत आहे.

डॉ धनंजय वर्णेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र मध्ये विविध उपक्रम राबवून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी घडवण्याचा मोठा उपक्रम राबवून विद्यार्थी प्रदेशापर्यंत पोहोचवले जातात.

### विभाग प्रमुख प्रतीक्षा डफळ यांच्या कुशल नेतृत्वाखाली प्रगती

कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा खरा पाया हा तेथील तज्ज्ञ आणि अनुभवी मार्गदर्शकांवर अवलंबून असतो. आयआयबीएम कॉलेजच्या हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट विभागाची धुरा विभाग प्रमुख प्रतीक्षा डफळ अत्यंत समर्थपणे सांभाळत आहेत. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील दांडगा अनुभव आणि व्यापक शैक्षणिक दृष्टिकोन यांमुळे त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ पुस्तकी ज्ञानच नाही, तर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक कौशल्ये (Practical Skills) आणि व्यावसायिकता रुजवण्यावर भर दिला आहे.

### शिक्षणाचा दर्जा आणि आधुनिक सुविधा

प्रतीक्षा डफळ, आणि त्यांच्या संपूर्ण टीमच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजमध्ये खालील प्रमुख बाबींवर विशेष भर दिला जातो:

- गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम – उद्योग जगतातील आधुनिक बदल आणि जागतिक गरजा लक्षात घेऊन तयार केलेला अद्ययावत अभ्यासक्रम.
- अत्याधुनिक प्रात्यक्षिक लॅब्स: विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा सराव मिळण्यासाठी आधुनिक किचन, फ्रंट ऑफिस, हाउसकीपिंग आणि रेस्टॉरंट सर्व्हिस लॅब्स.
- व्यक्तिमत्त्व विकास (GROOMING & SOFT SKILLS) – जागतिक पातळीवर वावरण्यासाठी उत्तम संवाद कौशल्य, बॉडी लँग्वेज आणि आत्मविश्वास वाढवणारी विशेष सत्रे.
- इंडस्ट्री एक्स्पोजर- नामांकित हॉटेल्सना भेटी (INDUSTRIAL VISITS), विविध कार्यशाळा आणि क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची विशेष व्याख्याने.

"विद्यार्थ्यांना केवळ पदवी मिळवून देणे एवढाच आमचा उद्देश नसून, त्यांना जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यासाठी सक्षम, स्वावलंबी आणि जबाबदार व्यावसायिक बनवणे हे आमचे ध्येय आहे."

- प्रतीक्षा डफळ (विभाग प्रमुख, IIBM)

## विद्यार्थी एक दिवसाचे प्राचार्या, उपप्राचार्या आणि प्राध्यापक; शिक्षक दिनाचा अनोखा उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शिक्षक दिनाचे औचित्य साधून चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयात 'एक दिवस विद्यार्थ्यांचा' हा अनोखा उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी प्राचार्या, उपप्राचार्या आणि प्राध्यापकांची भूमिका पार पाडली.**



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयात हा उपक्रम घेण्यात आला. सकाळी संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडे पदभार सोपवण्यात आला.

यामध्ये कु. मुस्कान शेख हिने एक दिवसाची प्राचार्या, कु. जेसिका शर्मा हिने उपप्राचार्या, तर ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध विभागांचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. विद्यार्थी प्राध्यापकांनी वर्गावर जाऊन तासिका घेतल्या, प्रात्यक्षिके घेतली आणि विद्यार्थ्यांच्या शंका सोडवल्या. तर विद्यार्थी प्राचार्यांनी दिवसभर महाविद्यालयाचे प्रशासन, शिस्त आणि शैक्षणिक कामकाजाचे नियोजन पाहिले.

आपल्या मनोगतात विद्यार्थी प्राचार्या मुस्कान शेख म्हणाली, "एक दिवस जरी असले तरी प्राचार्य पदाची जबाबदारी किती मोठी आहे, हे आज समजले. प्राध्यापकांना वर्ग सांभाळताना किती मेहनत घ्यावी लागते, याची जाणीव झाली." यावेळी विद्यार्थी प्राध्यापकांनीही आपल्या भावना व्यक्त करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, उपप्राचार्या डॉ. जयश्री मुळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, स्टाफ अकॅडमीच्या समन्वयिका डॉ. जयश्री कांबळे, प्रा. स्नेहल व्हाडे यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन विद्यार्थी प्राध्यापकांचा खास सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी शिक्षकांचे महत्त्व विषद केले, तर मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी आपल्या कारकिर्दीतील अनुभव सांगून मार्गदर्शन करताना भविष्यात आदर्श शिक्षकी पेशा स्वीकारण्याचे आवाहन शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांना केले. तुमच्यात आत्मविश्वास , प्रामाणिकपणा , विद्यार्थ्यांप्रती आदर हे गुण असतील तर ते अंगीकारून शिक्षकी पेक्षा भविष्यात स्वीकारावा . कारण शिक्षक हा एक पिढी धडवत असतो . चांगल्या शिक्षकांची आजही खूप गरज आहे असे सांगुन नुकताच आदर्श शिक्षक म्हणून गौरविण्यात आलेले महाराष्ट्रातील डॉ . कविता गित्ते , सीमा शिंदे , कुंदा बच्छाव याची सखोल माहीती उपस्थितांना दिली .

समारोप प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य व गणेश वंदना सादर केली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रियंका गंगावणे यांनी केले, सूत्रसंचालन विद्यार्थिनी सरस्वती जोशी हिने केले, तर आभार विद्यार्थी उपप्राचार्या जेसिका शर्मा हिने मानले. यावेळी सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमआयटी आळंदीमध्ये महिला सक्षमीकरणावर चर्चासत्र

## एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या सुकन्या मंचतर्फे चर्चासत्र संपन्न

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या सुकन्या मंचतर्फे आज “महिला सक्षमीकरणासाठी शासकीय योजना” या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सकाळी १०.०० वाजता सुरू झालेल्या या चर्चासत्रास महाविद्यालयातील विद्यार्थिनी व महिला प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.**




महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून संगीता शिवाजी जाधव उपस्थित होत्या.

आपल्या मार्गदर्शनात त्यांनी महिलांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक, कौशल्यविकास, स्वयंरोजगार, उद्योजकता आणि सामाजिक सुरक्षेशी संबंधित विविध योजनांवर प्रकाश टाकला. या योजनांचा उद्देश, त्यातून मिळणारे लाभ, लाभार्थी होण्यासाठी आवश्यक पात्रतेचे निकष, आवश्यक कागदपत्रे तसेच अर्ज करण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी सोप्या आणि सुलभ भाषेत माहिती दिली.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महिलांनी स्वतः जागरूक होण्याबरोबरच आपल्या कुटुंबातील व परिसरातील इतर महिलांनाही या योजनांची माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

यासोबतच त्यांनी महिला हेल्पलाइनचे महत्त्व आणि महिलांच्या सुरक्षिततेमध्ये तिची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. कौटुंबिक हिंसाचार, छळ, अत्याचार, संकटाची परिस्थिती किंवा इतर कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी महिलांनी घाबरून न जाता उपलब्ध मदत यंत्रणेशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले.

महिलांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहून आवश्यकतेनुसार शासकीय व कायदेशीर मदत घ्यावी, असा महत्त्वपूर्ण संदेशही त्यांनी दिला. त्यांचे मार्गदर्शन माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले.

कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये महिला सक्षमीकरण, सुरक्षितता, स्वावलंबन आणि शासकीय योजनांचा प्रभावी लाभ घेण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रम समन्वयक डॉ. वैशाली साठे यांनी प्रमुख वक्त्या, मान्यवर, उपस्थित महिला आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

आभार प्रदर्शनात कार्यक्रमाची सांगता झाली. हे चर्चासत्र संचालक डॉ. बी. बी. वाफारे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. सुनील महाजन आणि सुकन्या मंच समन्वयक डॉ. अर्चना आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

# एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, अँड कॉलेज श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव उत्साहात

**महाईन्यूज I पिंपरी-चिंचवड**

**एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, भोसरी येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदमय व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात माँ सरस्वती पूजन व भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.**





विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा, गोप-गोपी यांच्या सुंदर वेशभूषेत सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी भगवान श्रीकृष्णाच्या बाललीला व जीवनावर आधारित विविध नृत्य सादरीकरणे केली. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण नृत्याने संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. तसेच शिक्षकांनी सुंदर भक्तिमय भजनांचे सादरीकरण करून कार्यक्रमात भक्तीचा रंग भरला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने दहीहंडी फोडून जन्माष्टमीचा आनंद द्विगुणित केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना एकता, सहकार्य, संघभावना आणि आत्मविश्वास यांचा संदेश मिळाला. या कार्यक्रमासाठी मा. नाना पांडुरंग गवळी, मा. सुनितामाई पांडुरंग गवळी, मा. स्वप्नील पांडुरंग गवळी, मा. कोमल स्वप्नील गवळी, मा. संकल्प पांडुरंग गवळी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड सर, सुप्रिया मुळे मॅडम आणि तैसीन मुलानी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा गुरमे मॅडम व प्रियांका गावंडे मॅडम यांनी अत्यंत उत्कृष्ट व उत्साहपूर्ण पद्धतीने केले. त्यांच्या सुंदर सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. वैशाली यादव मॅडम व पूनम मॅडम यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुंदर सादरीकरणाचे कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, प्रशासन विभाग आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे मनःपूर्वक कौतुक करण्यात आले. भगवान श्रीकृष्णाच्या प्रेम, सत्य, कर्तव्य, भक्ती आणि सदाचाराचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पो होचवत हा उत्सव आनंदात व उत्साहात संपन्न झाला.